2841

क्रमांक:पोअवा/आलि.-२/अर्जित रजा/पो.क.(PC TO ASI/ /२०१८, वाशिम. दिनांक :- 17 APR 2018

संदर्भ :- मा.पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक नस्ती क्र.पोमसं/स्वीय सहा./बुलडाणा/निरीक्षण/२०१७, दि.१३/०४/२०१७.

विषय :- पोलीस कर्मचारी यांना वित्तीय वर्ष २०१८-१९ करिता १५ दिवसाची अर्जित रजा व १५ दिवसाची अर्जित रजेचा प्रत्यार्पण(रोखीकरण) मंजूरीबाबत व अर्जित रजा वर्षभराचे कॅलेंडर बनवुन त्याप्रमाणे पोलीस कर्मचाऱ्यांना दरमहा अर्जित रजेवर ठराविक प्रमाणात सोडणेबाबत...

-oooo-

**परिपत्रक :**

वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर कार्यरत असलेले "पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक" (PC TO ASI) पदापर्यंतचे पोलीस कर्मचारी यांची वित्तीय वर्ष २०१८-२०१९ करीता रजेवर सोडल्याचे दिनांकापासून १५ दिवसाची अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे.

२/- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एलव्हीई-२००२/प्र.क्र.५६४/पोल-५(ब), दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ अन्वये पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक पदापर्यंतच्या कर्मचाऱ्यासाठी एका वित्तीय वर्षात १५ दिवसांच्या अर्जित रजेच्या प्रत्यार्पणास शासन मंजूरी दिली आहे.

३/- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे ज्ञाप क्रमांक:एलव्हीई-२००२/प्र.क्र.५६४/पोल-५ब, दिनांक १० एप्रिल, २००७ अन्वये सदर शासन निर्णयानुसार एक वित्तीय वर्षात केवळ १५ दिवस रजा रोखीकरण पोलीस कर्मचा-यास देय राहील. त्याकरिता त्यांना १५ दिवस रजा घेणे आवश्यक राहणार नाही.

४/- त्या अनुषंगाने वित्तीय वर्ष २०१८-१९ करीता वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर कार्यरत असलेले सर्व पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंतच्या पोलीस कर्मचारी यांना १५ दिवसांची अर्जित रजेच्या प्रत्यार्पणास(रजा रोखीकरण) करण्याची परवानगी देण्यात येत आहे. जे पोलीस कर्मचारी वित्तीय वर्ष २०१८-१९ करीता १५ दिवसाची अर्जित रजेचा रोखीकरण रजा भोगता किंवा रजा न भोगता वर नमुद शासन परिपत्रक नुसार ०१ जुलै, २०१८ पूर्वी घेण्यास इच्छूक असतील अशा पोलीस कर्मचारी यांनी त्यांचे विनंती अर्ज प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने या कार्यालयास दिनांक ०१ जुन, २०१८ पर्यंत न चुकता सादर करावेत. तसेच जे पोलीस कर्मचारी ज्यांना वाढीव वेतनवाढीनंतरचे कालावधीत म्हणजेच ०१ जुलै, २०१८ नंतर १५ दिवसाचे अर्जित रजेचा रोखीकरण घेण्यास इच्छूक असतील अशा पोलीस कर्मचारी यांनी त्यांचे १५ दिवसाचे अर्जित रजेचा रोखीकरणाचे विनंती अर्ज दिनांक ०१ सप्टेंबर, २०१८ पर्यंत अर्जित रजेचा रोखीकरण करण्याकरीता सादर करावेत.

५/- उपरोक्त रजा हे सद्या निलंबित व दिर्घ सिक / गैरहजर असतील अशा पोलीस कर्मचारी यांना कर्तव्यावर हजर झाल्याचे दिनांकापासून सदर वित्तीय वर्षापर्यंत सदरची अर्जित रजा देय राहील.

६/- तसेच सर्व पोलीस कर्मचारी यांना कळविण्यात येते की, १५ दिवस अर्जित रजेचा रोखीकरण करण्याकरीता वित्तीय वर्ष २०१८-२०१९ करीता म्हणजे दि.०१ एप्रिल, २०१८ ते दि.३१ मार्च, २०१९ पर्यंतचा आहे. त्या करीता ज्या पोलीस कर्मचारी यांना रोखीकरण पाहिजे असल्यास त्यांनी वित्तीय वर्ष संपल्याचे अगोदर म्हणजे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ पर्यत अर्ज सादर करावा नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याबाबतची समज सर्व पोलीस कर्मचारी यांना दयावी.

७/- प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचारी यांचे वर्षभरात दरमहा कोणकोणते कर्मचारी अर्जित रजेवर सोडावयाचे आहे, याबाबतचे कॅलेंडर बनविण्यात यावेत.

८/- वार्षिक दरमहाचे कॅलेंडर अशाप्रकारे बनविण्यात यावे कि एकाचवेळेच प्रत्येक पोलीस स्टेशन / शाखेच्या हजर संख्याबळाचे १०% वर पोलीस कर्मचारी हे अर्जित रजेसह इतर रजेवर राहणार नाही याची प्रभारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

आवक/जावक क्र.- 405
19/4/18

९/- अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत जसे स्वतःचे/मुलाचे/ मुलीचे लग्न, गंभीर आजारपणावरील उपचार इत्यादी निकड लक्षात घेऊन कॅलेंडर व्यतिरिक्त संबंधित ठाणेदार / प्रभारी अधिकारी यांनी सकारात्मक निर्णय घेऊन अशा पोलीस कर्मचाऱ्यास त्यांचे विनंतीप्रमाणे अर्जित रजेवर सोडावे.

१०/- पोलीस कर्मचारी यांना रजेवर सोडतांना संबंधित ठाणेदार / प्रभारी अधिकारी यांनी आगामी सण / उत्सव / कायदा व सुव्यवस्था परिस्थीती इत्यादी बाबींचा देखील विचार करावा.

११/- चालु महिन्यात अर्जित रजेवर सोडलेल्या कर्मचाऱ्यांचा अर्जित रजेवर सोडलेबाबतचा अहवाल खालील नमुन्यात पुढील महिन्याचे पाच तारखेच्या आंत या कार्यालयास एकत्रितपणे न चुकता सादर करावा.

| अ.क्र. | पो.कर्म. पदनाम, बक्कल नंबर व नांव | अर्जित रजेवर सोडल्याचा कालावधी | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| | | | | |

१२/- जे पोलीस कर्मचारी त्यांना मंजुर १५ दिवस अर्जित रजेवर उपरोक्तप्रमाणे कार्यमुक्त होऊन निव्वळ कर्तव्य टाळण्याचे उद्देशाने १५ दिवसांचे पुढे कुठलेही गंभीर कारण नसतांना गैरहजर राहतील अशांविरुध्द गंभीर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना समज दयावी. अशा पोलीस कर्मचाऱ्यांचे कसुरी अहवाल संबंधीत प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयास न चुकता सादर करावा.

१३/- अर्जित रजा व साप्ताहिक सुट्टीबाबत उपरोक्त प्रमाणे उचित कार्यवाही होत आहे किंवा नाही. याबाबत संबंधीत ठाणेदार / प्रभारी अधिकारी यांनी दर १५ दिवसांनी आढावा घ्यावा. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी / पोलीस उपअधिक्षक(मुख्या.), यांनी उपरोक्त आदेशांची सकारात्मक अंमलबजावणी व्यवस्थित होत आहे. किंवा नाही याबाबतची खात्री करुन घेऊन त्याबाबतचा अहवाल दरमहा क्राईम मिटींगमध्ये सादर करण्याबाबत सर्व ठाणेदार / प्रभारी अधिकारी यांना सुचना द्याव्यात.

१४/- या परिपत्रकाचा उद्देश हा सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना आठवडयातून एकदा साप्ताहिक रजा व वर्षभरातून एकदा १५ दिवस अर्जित रजा व वित्तीय वर्ष करीता १५ दिवसाचे अर्जित रजा प्रत्यार्पण(रजा रोखीकरण) उपभोगून आपले कुटूंबियास वेळ देणे हा आहे. त्यामुळे या परिपत्रकाचे सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी /सर्व ठाणेदार /सर्व शाखा प्रभारी वाशिम जिल्हा यांनी तंतोतंत सकरात्मक पालन होईल याची दक्षता घ्यावी.

१५/- हे परिपत्रक सर्व पोलीस कर्मचा-यांना समजणेकामी नोटीस बोर्डावर दर्शनी भागावर सर्वाकरिता लावण्यात यावे.

**( मोक्षदा पाटील )**
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

ठाणेदार, पोलीस स्टेशन, वाशिम शहर/ वाशिम ग्रामीण/मालेगांव/शिरपुर/रिसोड/ अनसिंग/ आसेगांव/ जऊळका/ मंगरुळपीर/कारंजा शहर/ कारंजा ग्रामीण/ मानोरा/धनज बु./स्थागुशा/ जिविशा/ नियंत्रण कक्ष/ कल्याण शाखा/ शवाशा/ जिवाशा/बिनतारी संदेश विभाग/पोउपनि.,मतनि/वाचक शाखा/अमानी/ दहशतवाद विरोधी पथक/सायबर पो.स्टे.,/ पोउपनि.,मोपवि./बॉम्ब शोधक पथक/श्वान पथक/नाहसं/ रापोनि.,पोलीस मुख्यालय,वाशिम.

प्रत माहितीस :-

अपर पोलीस अधीक्षक, वाशिम / उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम/मंगरुळपीर/कारंजा/ पोउपअधि.आर्थीक गुन्हे शाखा, वाशिम/ पोलीस उपअधिक्षक(मुख्या.), वाशिम.

<u>प्रतिलिपी माहितीस व उचित कार्यवाहीस्तव :-</u>

डिपीजी लिपीक/संगणक कक्ष पो.अ. कार्यालय, वाशिम.

२/- संगणक कक्ष यांनी सदरचे आदेश हे पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वाकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी /सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रभारी यांचे संकेतस्थळावर "ई-मेल" व्दारे त्वरीत पाठविण्यात यावे.